**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 11 No. 6** **July-Aug 2024**

# समाज माध्यमांचा राजकारणावर होणारा परिणाम

**लोकेश बाबुलाल तायडे**
(संशोधक विद्यार्थी), क.ब.चौ.उ.म.वि.जळगाव
**Corresponding Author: लोकेश बाबुलाल तायडे**
**Email:** gploks@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.13859328**

**संक्षेप:**

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात, सोशल मीडिया राजकारणावर अनन्यसाधारण प्रभाव टाकत आहे. पारंपरिक संवाद पद्धतींमुळे माहितीच्या प्रसारात खूप वेळ लागत होता, पण फेसबुक, ट्विटर आणि इतर प्लॅटफॉर्मच्या आगमनाने राजकीय पक्षांना जनतेपर्यंत थेट पोहोचण्याची संधी मिळाली आहे. या माध्यमांनी संवाद साधणे अधिक सुलभ केले असून, जनतेचा सक्रिय सहभाग वाढला आहे. लोक त्यांच्या समस्या, अपेक्षा आणि मुद्दे थेट राजकीय पक्षांपर्यंत मांडू शकतात, ज्यामुळे राजकीय साक्षरता आणि विविधतेला महत्त्व मिळाले आहे. तथापि, सोशल मीडियाचा दुरुपयोग करून फेक न्युज आणि चुकीची माहिती पसरवण्याचे गंभीर प्रश्न देखील उभे राहिले आहेत, ज्यामुळे जनतेमध्ये गोंधळ निर्माण होतो.

भारतीय जनता पक्षाच्या 2014 च्या निवडणुकीतील यशस्वी सोशल मीडिया वापरामुळे हे स्पष्ट झाले आहे की, योग्य माहितीचा प्रसार आणि संवाद अधिक प्रभावी बनवला जाऊ शकतो. या कारणास्तव, जनतेने माहितीची पडताळणी करणे आवश्यक आहे, जेणेकरून समाजातील विकासात सकारात्मक योगदान मिळवता येईल. त्यामुळे, सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर केल्यास राजकारणात सकारात्मक बदल साधता येऊ शकतो आणि समाजाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावता येईल.

**कीवर्ड्स:** आधुनिक तंत्रज्ञान, सोशल मीडिया, राजकारण, संवाद, पारंपरिक पद्धती, माहितीचा प्रसार, फेसबुक, ट्विटर, फेक न्युज, दुरुपयोग, सक्रिय सहभाग, राजकीय पक्ष, राजकीय साक्षरता, विविधता, भारतीय जनता पक्ष, निवडणूक, सकारात्मक योगदान.

## प्रस्तावना:

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात सोशल मीडिया हे एक प्रभावी साधन बनले आहे त्यामुळे केवळ वैयक्तिक संवाद वाढत नसून समाजातील सर्व स्तरांवर त्याचा प्रभाव पडतो वशेषतः राजकारणावर या लेखात समाज माध्यमांचा राजकारणावर होणाऱ्या परिणामांचा सखोल अभ्यास केलेला आहे यामध्ये सोशल मीडियाच्या वापराचे महत्त्व त्याचे समाजातील स्थान आणि त्यांनी आणलेले परिवर्तन याचा समावेश केलेला आहे.

सोशल मीडियाचा उपयोग पूर्वी लोकांना विचारांची देवाण-घेवाण करण्यासाठी सूचना आणि मतांचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी केला जात होता परंतु आता या माध्यमाने राजकारणाच्या प्रक्रियेत एक नवीन दिशा दिली आहे राजकीय पक्षांना त्यांच्या विचारधारा जनसेपर्यंत पोहोचवण्यासाठी अधिक सुलभ झाले आहे तथापि त्यामुळे काही गंभीर समस्या सुद्धा उभ्या राहिल्या आहेत उदाहरणार्थ माहितीच्या सत्यतेवर प्रश्नचिन्ह, चुकीच्या बातम्या, अफवा आणि दुरुपयोग.

## इतिहास आणि सामाजिक संदर्भ:

### पूर्वीच्या राजकीय संवादाच्या पद्धती-

राजकीय पक्षांचे संवाद पद्धतपूर्वी प्रत्यक्ष उपस्थितीच्या आधारावर होती. प्रत्यक्ष भेटीवर जास्त भर दिला गेला होता त्याचप्रमाणे टीव्ही रेडिओ वर्तमानपत्र आणि पोस्टर्स यासारखी पारंपारिक माध्यमे वापरून प्रचार केला जात होता यामध्ये माहितीच्या प्रसार वेळखाव होता आणि खूप प्रमाणात संसाधनांची आवश्यकता ही होती पूर्वी राजकारणामध्ये विचारांची देवाण-घेवाण थेट संवादावर अवलंबून होती.

सर्वसामान्य नागरिकांच्या मनातील विचार समस्या आणि अपेक्षा प्रत्यक्ष भेटीत व्यक्त होत्या राजकीय पक्षांना विविध ठिकाणी सभा आयोजित करून जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करावी लागत होती त्यामुळे राजकीय संवाद साधण्यासाठी खूप कष्ट लागत असत मोठ्या शहरांमध्ये वाहतुकीची व्यवस्था असेल तर प्रचार सोपा होईल परंतु खेड्यापाड्यात पोहोचण्यासाठी खूप श्रम आणि वेळ वाया जात असे त्यामुळे विविध समुदायांमध्ये अपूर्ण माहिती आणि वेळेचा अपव्यय झाला.

**सोशल मीडियाचा उदय:**

सोशल मीडियाच्या आगमनाने सर्व जग बदलले 2000 च्या दशकाच्या सुरुवातीला फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम,व्हाट्सअप, टेलिग्राम यासारख्या प्लॅटफॉर्मने लोकांच्या संवादाची पद्धत पूर्णपणे बदलली. याद्वारे लोकांना विचारांची देवाण-घेवाण करण्यासाठी नवीन साधन प्राप्त झाले आणि प्रत्येक व्यक्तीला विचारांची अभिव्यक्ती करण्याची संधी मिळाली. या बदलामुळे राजकारणात सुद्धा पर्यायाने मोठा बदल झाला राजकीय पक्षांना त्यांच्या विचारधारा आणि योजना वेगाने प्रसारित करण्याची आणि जनतेपर्यंत पोहोचण्याची संधी मिळाली त्यामुळे मतदारांमध्ये जागरूता वाढली आणि सहभागही वाढला.

**सोशल मीडियाचा राजकारणात वापर:**

**संवादाची नवी पद्धत-**

सोशल मीडियाद्वारे राजकीय संवाद साधने अधिक सुलभ झाले आहे त्यामुळे राजकीय पक्षांना त्यांच्या विचारधारांची योजना आणि उपक्रमांची माहिती लोकांपर्यंत जलद गतीने पोहोचवण्यास मदत झाली आहे सोशल मीडिया हे साधन लोकांची थेट संपर्क साधण्याची संधी देते हे माध्यम प्रत्येक व्यक्तीला आपल्या विचारांचे व्यक्ति करण करण्यास प्रोत्साहित करते त्याचप्रमाणे राजकीय चर्चांमध्ये लोकांचा सहभाग वाढला आहे ट्विटरवर थेट चर्चा फेसबुक वर संवाद आणि युट्युब वरील व्हिडिओच्या माध्यमातून संवाद साधता येतो आणि जनतेशी एक प्रकारे थेट संवाद साधून त्यांची प्रतिक्रिया घेणे प्रतिसाद घेणे अपेक्षा आणि समस्या समजून घेणे इत्यादी गोष्टी सहज आणि सोप्या झाल्या आहेत.

**समूह मानसशास्त्राचा उपयोग:**

राजकारणात समूह मानसशास्त्राचा अभ्यास महत्त्वाचा आहे सोशल मीडियाच्या माध्यमातून राजकीय पक्ष त्यांच्या विचारधारांच्या प्रसारासाठी समूहाच्या मानसिकतेचा उपयोग करतात समूहांच्या भावना आणि विश्वासांचा अभ्यास करणे आवश्यक आहे त्यामुळे राजकीय प्रचार अधिक प्रभावी होतो आणि लोकांमध्ये एकजुटीची भावना निर्माण होते.

समूह मानसशास्त्राचा उपयोग करून लोकांना एकत्रितपणे विचार करण्यास प्रवृत्त करणे सोपे होते या प्रक्रियेत राजकीय पक्ष त्यांच्या प्रचारासाठी इतर लोकांच्या समर्थन मिळवतात त्यामुळे प्रत्येक पक्षासोबत जाणाऱ्या विविध समूहांची दिशा ठरत जाते आणि पक्ष बळकट होत जातात.

**माहितीचा दुरुपयोग:**

सोशल मीडियाचा दुरुपयोग ही गंभीर समस्या निर्माण झालेली आहे काही राजकीय पक्ष चांगल्या गोष्टींचा प्रचार करणे किंवा नकारात्मक गोष्टी दडपणे यासाठी सोशल मीडिया वापरतात या सर्व गोष्टींना योग्य दिशा देत नाही तर अनेक वेळा दिशाभूल करण्यासाठी याचा वापर होतो राजकारणी त्यांच्या पक्षाची हितसाठी खोटी माहिती पसरवतात. बडेजाव आणतात त्यामुळे जनतेच्या मनात गोंधळ निर्माण होतो.

फेक न्युज खोटी माहिती माहितीच्या पूर्णतेमुळे राजकारणी जनतेच्या मनावर प्रभाव टाकण्यासाठी प्रसार माध्यमांचा व समाज माध्यमांचा वापर करतात आणि माहितीच्या सत्यतेवर मात्र प्रश्नचिन्ह उपस्थित करतात यासाठी जनतेने सावध होऊन माहितीची शहानिशा करून पडताळणी करण्याची आवश्यकता आहे.

**खोट्या बातम्या आणि माहितीचे नियंत्रण**

फेक न्युज ही एक गंभीर समस्या झालेली आहे अनेकदा माहितीचे खरे पण तपासण्याची आवश्यकता असते परंतु लोक आंधळेपणाने विश्वास ठेवतात त्यामुळे राजकारणी याचा फायदा घेऊन प्रचारासाठी फेक न्यूज चा वापर करतात आणि समाजाला भ्रमित करतात. फेक न्युज चा सामना करण्यासाठी अनेक लोकांनी आणि समुदायांनी एकत्रितपणे काम केलेले आहे तरीही यामध्ये सुधारणा आवश्यक आहे जनतेच्या मनावर विश्वास ठेवणारे माध्यमांचा उपयोग करून खोटी माहिती पसरविणे हा एक गंभीर धोका आहे.

**सामाजिक प्रभाव**

**जनतेचा सहभाग वाढला आहे**

समाज माध्यमांद्वारे जनतेचा सक्रिय सहभाग वाढलेला आहे लोक आपल्या विचारांची समस्यांची अपेक्षांची थेट राजकीय पक्षांपर्यंत मांडणी करू शकतात पोहोचू शकतात हे माध्यम जनतेला त्यांच्या आवाजाचा प्रभाव असावा याची जाणीव करून देते त्यामुळे लोकांमध्ये राजकारणाबद्दल खूप जागरूकता वाढलेली आहे राजकीय चर्चांमध्ये लोकांनी आपलं मत व्यक्त करणे त्यांच्या प्रश्नांची उत्तरे मागणं आणि विविध मुद्द्यांवर चर्चा करणे सुरू केलेले आहे .त्यामुळे जनतेच्या समस्यांना अधिकाधिक महत्त्व दिले जाते आणि राजकारणी त्यांच्या जबाबदाऱ्यांचा विचार करू लागले आहेत.

**राजकीय साक्षरता**

सोशल मीडियामुळे राजकीय साक्षरता वाढलेली आहे लोकांना राजकीय प्रक्रिया निवडणूक प्रक्रिया आणि त्यांच्या अधिकारांविषयी अधिक माहिती मिळत आहे त्यामुळे लोक मतदानासाठी सज्ज होत आहेत आणि त्यांचे विचार अधिक स्पष्टपणे व्यक्त करून मतदानाच्या अधिकाराचा व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा योग्य उपयोग करत आहेत.

राजकीय साक्षरतेचा विकास हा जनतेच्या सहभागाच्या वृद्धीत महत्त्वाचा घटक आहे त्यामुळे राजकीय प्रक्रिया प्रक्रियेत लोकांच्या सहभागाची पातळी वाढते आणि त्यांना त्यांच्या मूलभूत अधिकारांची जाणीव होते.

**विविधता आणि सर्वसमावेशकता:**

सोशल मीडियाने विविधतेला मान्यता दिलेली आहे विविध समुदाय वर्ग जनतेच्या विविध विचारधारांचा

संवाद साधण्याची संधी मिळाली आहे त्यामुळे विविध विचारधारा एकत्र येऊन नवीन विचारधारांचा विकास होतो आहे.

सोशल मीडियावर चर्चा करण्याच्या प्रक्रियेत विविध समुदायांचे मुद्दे समस्या आणि अपेक्षा एकत्रितपणे मांडले जातात त्यामुळे राजकारणी लोक समस्यांवर अधिक लक्ष केंद्रित करतात आणि त्यांच्या योजनांमध्ये विविधतेला प्राधान्य देण्याचा प्रयत्न करतात.

सोशल मीडियाच्या माध्यमातून राजकीय पक्षांना त्यांच्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी तात्काळ प्रतिसाद मिळतो त्यामुळे त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे बदल करणे व जनतेची मर्जी जिंकून घेणे हे काम त्यांच्यासाठी सहज सोपे होते जनतेच्या समस्या त्वरित समजून घेऊन त्यावर काम करणे शक्य होते आणि राजकीय पक्षांना अधिक जलद गतीने कामे करण्यास साहाय्य मिळते.

सोशल मीडियाच्या वापरामुळे लोकांच्या समस्या आणि अपेक्षा त्वरित समजून घेता येतात त्यामुळे राजकीय पक्ष त्यांच्या योजनांना अधिक कार्यक्षमतेने अमलात आणण्यास व आपल्या पक्षाची नीती लोकांना समजावून देण्यात सक्षम होतात.

**यशस्वी उदाहरणे:**

**भारतीय जनता पक्षाचा सोशल मीडिया वापर:**

भारतीय जनता पक्षाने 2014 च्या लोकसभा निवडणुकीत सोशल मीडियाचा प्रभावी वापर केला त्याचबरोबर नरेंद्र मोदी यांच्या व्यक्तिमत्वामुळे तरुण वर्गाचे लक्ष वेधले गेले. त्यांनी विविध प्लॅटफॉर्मवर सक्रियता वाढवली, चर्चा वाढवल्या, विविध विषयांवर भाषणे दिली आश्वासाने दिली त्यामुळे जनतेत एक चांगला संदेश गेला.

भारतीय जनता पक्षाने त्यांच्या प्रचार मोहिमेत डिजिटल माध्यमांचा वापर करून लोकांमध्ये एक सशक्त संदेश निर्माण केला त्यामुळे त्यांच्या प्रचारात विविधतेला महत्त्व देण्यात आले. मोदी यांच्या यशस्वी प्रचारात सोशल मीडिया हा एक महत्त्वाचा घटक ठरला. लोकांचे लक्ष त्यामुळे केंद्रित झाले आणि विश्वास वाढू लागला.

**अन्य जागतिक उदाहरणे:**

जागतिक पातळीवर देखील सोशल मीडियाचा प्रभाव जाणवला आहे अमेरिका युरोप आणि इतर देशांमध्ये राजकीय पक्षांनी सोशल मीडियाचा प्रभावी वापर करून त्यांच्या प्रचार मोहिमांचा विस्तार केलेला आहे उदाहरणार्थ बर्नी सँडर्सच्या प्रचारात सोशल मीडिया महत्वपूर्ण ठरला.

बांगलादेशात सत्तापालट होण्यामध्ये सोशल मीडियाचा महत्त्वाचा वाटा आहे.

युरोपातील काही देशांमध्ये निवडणूक प्रचारात सोशल मीडियाचा वापर प्रचंड प्रमाणात वाढलेला आहे त्यामुळे जनतेच्या सहभागाची पातळी वाढली आहे आणि त्यांच्या समस्या अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यात आलेल्या आहेत.

**आंतरराष्ट्रीय राजकारण:**

सोशल मीडियाने आंतरराष्ट्रीय राजकारणात सुद्धा महत्त्वाची कामगिरी केलेली आहे अनेक देशांमध्ये सोशल मीडिया वरून होणारे संवाद आणि चर्चा विविध क्षेत्रातील जागतिक समस्यांवर लक्ष केंद्रित करतात उदाहरणार्थ पर्यावरणीय बदल मानवाधिकार सामाजिक न्याय, अवकाशीय माहिती, विविध प्रकारचे वैज्ञानिक शोध यासारख्या मुद्द्यांवर जागतिक स्तरावर चर्चेत सोशल मीडिया एक महत्त्वाची भूमिका बजावतो.

आंतरराष्ट्रीय स्तरावर सोशल मीडियाच्या वापरामुळे लोकांना विविध मुद्द्यांवर विचार करण्यास चर्चा करण्यास प्रेरित केली जाते त्यामुळे जागतिक समस्यांवर जगातील सर्वसामान्य जनतेची जागरूकता वाढते व सहभागही वाढतो.

**निष्कर्ष:**

सोशल मीडियाचा राजकारणावरील प्रभाव व त्याचे महत्त्व हे अनन्यसाधारण आहे. त्यामुळे राजकीय संवाद साधणे अधिक सुलभ झाले आहे तसा पी माहितीच्या योग्य तेवर व खरेपणावर जागरूकपणे लक्ष देणे तितकेच महत्त्वाचे आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत योग्य ती माहिती पोहोचणे हे समाज माध्यमासमोर मोठे आव्हान आहे.

सोशल मीडिया या संवादाच्या नवीन पद्धतीमुळे एकत्रित विचार पद्धतीला महत्त्व दिले आहे सोशल मीडियाच्या योग्य वापराची जबाबदारी ही प्रत्येक नागरिकाची आहे त्यामुळे प्रत्येकाने अधिक सजग आणि विचारशील होण्याची आवश्यकता आहे.

राजकारणी आणि पक्षांनी आपल्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करताना सत्यता आणि प्रामाणिकता बाळगणे महत्त्वाचे आहे त्यामुळे समाजामध्ये विश्वास निर्माण होईल आणि लोकांच्या मनावर प्रभावीपणे कार्य करणे शक्य होईल.

समाज माध्यमांचा उपयोग जबाबदारीने केला गेला तर समाजातील विकासामध्ये त्याचे सकारात्मक योगदान होऊ शकेल. परिणामी राजकारणात सोशल मीडियाचा प्रभाव अधिक सकारात्मक आणि सामर्थ्यवान ठरेल.

**संदर्भ -**


1. Sharma, A. (2020). Social media and its impact on politics. Journal of Political Communication, 15(3), 231-250.
2. Gupta, R. (2019). The role of digital media in modern politics. International Journal of Media Studies, 22(4), 310-325.
3. Kumar, S. (2021). Fake news and its implications in political discourse. Media, Culture & Society, 43(5), 893-909.

4. Joshi, P., & Desai, V. (2022). Political engagement in the age of social media. Journal of Communication Research, 19(2), 123-140.
5. Iyer, M. (2023). Digital politics: A global perspective. International Journal of Political Science, 28(1), 45-60.